③

# “कलम १९ अधिसूचना”

क्र.कावि/भूसंपादन/मं.अ/ २६२/२०१७
उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी
सिंदखेडराजा यांचे कार्यालय.
दिनांकः-२०/०२/२०१७

क्रमांक : भूसंपादन प्रकरण क्रमांक ७/२०१३-१४ मौजे निमगाव वायाळ तालुकाः- सिंदखेडराजा जि.बुलडाणा ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम(१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक क्रमांक १०२८ दिनांक २१.१२.२०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “पुनर्वसाहत क्षेत्र” म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, सिंदखेडराजा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक
## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांकः-७/२०१३-१४

गावः- निमगाव वायाळ तालुकाः- सिंदखेडराजा जिल्हाः- बुलडाणा

| अ.क्र | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | १९० | ०.२४ |
| २ | १८९ | ०.०१ |
| ३ | १९७ | ०.२१ |
| ४ | १९९ | ०.२७ |
| | एकूण | ०.७३ |

एकूणः- ०.७३ हे.आर

## अनुसूची- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- खडकपुर्णा प्रकल्प,देऊळगावराजा

प्रकल्प कार्याचे वर्णन :- खडकपुर्णा प्रकल्पासाठी निमगाव वायाळ उपसा सिंचन योजनेच्या थेट लघुपाटाच्या कामासाठी मौजे. निमगाव वायाळ ता.सिंदखेडराजा जि. बुलडाणा येथील खाजगी जमिनीचा उर्वरीत भूसंपादन प्रस्ताव ०.७३ हे.आर

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उदयोगधंदयाना पाणी पुरवठा होणार आहे.त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मीती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी,शेतकरी,भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात ( STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची- ३

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

## गाव,नारायणखेड ता.देऊळगावराजा जिल्हा, बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| | निरंक | |

## अनुसूची- ४

## ( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

टीप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, कार्यालय सिंदखेडराजा,ता.सिंदखेडराजा जि. बुलडाणा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः-२० /०२/२०१७

ठिकाणः- बुलडाणा

( नम्रता चाटे )
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी सिंदखेडराजा

(डॉ.विजय झाडे )
जिल्हाधिकारी,बुलडाणा